असा. क्र. २२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, फेब्रुवारी २२, २००८/फाल्गुन ३, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ फेब्रुवारी २००८

अधिसूचना

मोटार वाहन अधिनियम, १९८८.

क्रमांक एमव्हीआर. ०८०७/प्र. क्र. १२२/परि-२.— मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम २८, पोट-कलम (२) खंड (ट) आणि कलम २११ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजिलेल्या नियमांचा पुढील मसुदा त्यामुळे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम २१२ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, या अधिसूचनेचा

[**किंमत** : रुपये ७.००]

मसुदा **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांनंतर उक्त मसुदा महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. उपरोक्त कालावधीच्या आत उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग (परिवहन), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे येतील त्या शासनाकडून विचारात घेतल्या जातील.

नियमांचा मसुदा

१. या नियमांना, महाराष्ट्र मोटार वाहन (चौथी सुधारणा) नियम, २००८ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यांच्या नियम १३ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" १३क. **वाहन चालविण्याच्या लायसनाचा तपशील पुरविणे.—** लायसन प्राधिकारी, शासकीय अभिलेखामध्ये ठेवण्यात आलेल्या वाहन चालविण्याच्या लायसनाबाबच्या तपशिलाची माहिती कोणत्याही व्यक्तीने वीस रुपये फी भरून अर्ज केल्यावर तिला पुरवील :

परंतु, राज्य शासनास शासकीय निर्णयाद्वारे, शासनाचा कोणताही विभाग, स्थानिक प्राधिकरण, मंडळ किंवा स्वयंसेवी संस्था यांना अशी फी भरण्यातून सूट देता येईल किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी अशी फी कमी करता येईल. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जे. एम. चव्हाण,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400032, dated the 22nd February 2008

NOTIFICATION

MOTOR VEHICLES ACT, 1988.

No. MVR. 0807/CR-122/TRA-2.—The following draft of the rules further to amend the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (*k*) of sub-section (*2*) of section 28 read with section 211 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) and of all other powers enabling it in this behalf, is hereby published, as required by sub-section (*1*) of section 212 of the said Act, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after thirty days from the date on which this draft Notification is published in the *Maharashtra Government Gazette.*

2. Any objections or suggestions which may be received by the Principal Secretary to the Government of Maharashtra, Home Department (Transport), Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft, within the aforesaid period, will be considered by the Government.

DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Motor Vehicles (Fourth Amendment) Rules, 2008.

2. After rule 13 of the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989, the following rule shall be inserted, namely :—

"13A. *Supply of particulars of driving licence.*—The licensing authority may supply information of the particulars of the driving licence maintained in the official record to any person on an application made by him on payment of fee of rupees twenty.

Provided that, the State Government may by Government Resolution exempt any Government Department, Local Authority, Board or Non Government Organisation from payment of such fee or reduce such fee for the public purposes. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. M. CHAVHAN,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई